**वैद्यकीय व आरोग्य क्षेत्राशी संलग्नित “मुख्यमंत्री महा-आरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम” राबविण्यास मान्यता देणेबाबत......**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२१/प्र.क्र.४८/कौशल्य-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०२१

<u>वाचा</u> : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/ रोस्वरो-१, दिनांक ०३/०८/२०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/ रोस्वरो- १, दिनांक ०२/०९/२०१५.
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ २०१७/ प्र. क्र. २३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१८/ प्र. क्र. १२४/अभियान-१,दिनांक २०/०८/२०१९
५) कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: कौविउ२०२०/ प्र.क्र. १३६/कौशल्य-१ (अभियान-१). दिनांक १० मार्च. २०२१.

**<u>प्रस्तावना :</u>**

केंद्र शासनाच्या स्कील इंडीया या संकल्पनेस अनुसरुन महाराष्ट्र राज्याने कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र हे ध्येय समोर ठेवले आहे. त्याकरिता राज्यातील युवक/युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/ स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येते. कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यासाठी “महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS)” या स्वतंत्र संस्थेची दि.१५/०२/२०११ रोजी स्थापना करण्यात आली आहे. सदर संस्था कौशल्य विकास योजनेकरिता “नोडल एजन्सी” म्हणून कार्यरत आहे. राज्याच्या कौशल्य व उद्योजकता विभागाने कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यास सं.क्र. १ येथील शासन निर्णयान्वये “प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA)” या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२. सध्या राज्यामध्ये कोविड -१९ या साथीच्या आजारावरील रुग्णावर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पॅरामेडीकल क्षेत्रातील प्रशिक्षित मानव संसाधनांनी तीव्र कमतरता जाणवत असून यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत पॅरामेडीकल क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी हेल्थ केअर सेक्टर स्कील कौन्सिलमधील विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. सदर अभ्यासक्रम साथीच्या रोगाशी लढण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. त्यानुषंगाने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षण घेवू इच्छिणाऱ्या राज्यातील युवक/ युवतींना वैद्यकीय क्षेत्राशी संलग्नित प्रशिक्षण मिळाल्यास तसेच यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र मिळाल्यास त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकेल. असे उमेदवार आरोग्य क्षेत्राशी संबंधित सेवेमध्ये नोकरीसाठी पात्र ठरु शकतील याकरिता सदर अभ्यासक्रम राबविण्याऱ्या राज्यातील सर्व खाजगी व सरकारी वैद्यकीय संस्थांना /इस्पितळांना व्यावसायिक प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करणे तसेच अशा संस्थांना प्रशिक्षण

तुकडी क्रमांक देण्यात येवून या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी राज्यामध्ये "मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रामध्ये साथीच्या रोगाशी संबंधित उद्भवलेल्या परिस्थितीत कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे तसेच या क्षेत्रातील संसाधनांनामधील आवश्यक मनुष्यबळाचा तुडवडा दूर व्हावा, याकरीता आरोग्य क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असलेल्या राज्यातील युवक-युवतींना हेल्थकेअर, मेडिकल व नर्सिंग व डोमेस्टिक वर्कर क्षेत्रांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA) अंतर्गत "मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. "मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण" या कार्यक्रमाची मार्गदशर्क तत्वे व निकष सं. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA)" प्रमाणेच असून सध्या राज्यामध्ये कोविड -१९ परिस्थितीमध्ये तात्काळ मनुष्यबळ पुरविण्याकरीता खालील नमूद मार्गदशर्क तत्वे व निकषांमध्ये शिथिलता देण्यात आली आहे.

२.१ राज्यातील सर्व शासकीय इस्पितळे तसेच वैद्यकीय शिक्षण संस्था यांना ग्रीन चॅनेलद्वारे व्यावसायिक प्रशिक्षण संस्था (VTI) म्हणून नोंदणी करून सदर संस्थांची निवड करण्यात येईल तसेच,ज्या खाजगी इस्पितळांमध्ये २० पेक्षा अधिक बेड्स आहेत अशा इस्पितळांची ग्रीन चॅनेलद्वारे व्यावसायिक प्रशिक्षण संस्था (VTI) म्हणून नोंदणी करून सदर संस्थांची निवड करण्यात येईल.

२.२ इस्पितळामध्ये आरोग्य कौशल्य प्रशिक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखास राहतील.

२.३ प्रशिक्षण तुकडीमध्ये उमेदवारांची संख्या किमान २० व कमाल ३० असावी, परंतु विशेष बाब म्हणून या योजनेकरिता प्रशिक्षण तुकडीमध्ये एकूण प्रशिक्षणार्थ्यांची किमान मर्यादा ५ पर्यंत करण्यात मुभा असेल.

२.४ कोव्हीड-१९ बाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची ने-आण करण्यासाठी वाहनचालक तसेच ॲम्बुलंस वाहनचालक अभ्यासक्रमाचादेखील समावेश असेल.

२.५ प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थींची नोंदणी सक्षम यंत्रणेमार्फत करण्यात यावी. यासंदर्भात संबंधित विभागांनी आवश्यक निर्णय व उपाययोजना करावी.

२.६ प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थींनी त्यांची सेवा किमान ६ महिने शासकीय किंवा खाजगी इस्पितळाना देणे अनिवार्य असेल.

२.७ प्रशिक्षण प्राधान्याने On Job Training तत्वावर देण्यात येईल. याकरिता उमेदवारांना विद्यावेतन (stipend) संबधित संस्थेकडून देण्यात यावे. तसेच याबाबतचे टप्पेनिहाय प्रशिक्षण शुल्क प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत अदा करण्यात येईल.

३. “मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण” कार्यक्रम सं. क्र. ४ येथील शासन निर्णयास अनुसरुन इतर विभागाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. तसेच या कार्यक्रमांतर्गत आवश्यकतेनुसार “पूर्व कौशल्य ज्ञान मान्यता प्रशिक्षण प्रतिमान मॉडेल” अंतर्गत (Recognition of Prior Learning- RPL) देखील प्रशिक्षण देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. तसेंच सदर अभ्यासक्रम राबविण्याऱ्या राज्यातील सर्व खाजगी व सरकारी वैद्यकीय संस्थांना/ इस्पितळांना व्यावसायिक प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात येत असून अशा संस्थांना प्रशिक्षण तुकडी क्रमांक देण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेमार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर कार्यक्रमाची प्रभावीपणे व जलदगतीने अंमलबजावणी होण्यासाठी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी”, सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना “आहरण व संवितरण अधिकारी” आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना “नोडल एजन्सी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी या कार्यक्रमांतर्गत शासनाकडून वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना खर्च करण्यासाठी वर्ग करावा. प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानांतर्गत व इतर विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीबाबतचे लेखाजोगे स्वंतत्र ठेवण्यात यावे. तसेच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या विधानमंडळविषयक बाबी निधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या संबंधित विभागाने हाताळाव्यात.

८. “मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रमाच्या” अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावरील संनियंत्रण समिति खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **विभाग** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग | सदस्य |

| अ.क्र. | विभाग | पदनाम |
|---|---|---|
| ५ | संचालक, सार्वनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ६ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | सदस्य |
| ७ | संचालक, महाराष्ट्र आयुर्वेद संस्था | सदस्य |
| ८ | आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | सदस्य |
| ९ | सह संचालक महाराष्ट्र राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषद | सदस्य |
| १० | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अभियान समन्वयक, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | सदस्य सचिव |

राज्यस्तरावरील संनियंत्रण समितीं या प्रशिक्षण कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेईल. यासदंर्भातील मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०५१९१५४५११०५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2021.05.19 15:55:04 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
सह सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व संबंधित मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई,
१२. आयुक्त तथा नगर संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. सर्व जिल्हाधिकारी,
१५. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
१८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर,
२०. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, मुंबई,
२१. उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय मुख्यालय मुंबई/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२२. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. निवड नस्ती.